# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४

अत्यंत महत्वाचे

क्र. कोविमं/१२ वी गोप./प्रात्य./ 101
दिनांक : ०८/०४/२०२२

प्रति,
प्राचार्य,
कोल्हापूर विभागीय मंडळ कक्षेतील,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये
सातारा, सांगली, कोल्हापूर

**विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च /एप्रिल २०२२ च्या आऊट ऑफ टर्नने घेतलेल्या तोंडी/ प्रात्यक्षिक/ श्रेणी परीक्षेचे गुण व साहित्य जमा करणेबाबत....**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रान्वये ज्या विद्यार्थ्यांची तोंडी, तंत्र व्यावसायिक तसेच किमान कौशल्यावर आधारीत व्यावसायिक विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा, भाषा व इतर विषयांच्या तोंडी परीक्षा नियमित कालावधीमध्ये होऊ शकली नाही अशा विद्यार्थ्यांची **भाषा व इतर विषयांच्या तोंडी परीक्षा आऊट ऑफ टर्नने दिनांक ३१ मार्च २०२२ ते दिनांक १८ एप्रिल २०२२** या कालावधीत आयोजित करणेबाबत कळविण्यात आले होते. **सदरची आऊट ऑफ टर्नची परीक्षा ही त्या संबंधित विद्यार्थ्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयातच घेण्यात यावी.** सदरची आऊट ऑफ टर्न परीक्षा पूर्ण झाल्यानंतर संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षोत्तर गोपनीय साहित्य सिलबंद करुन **दिनांक १९/०४/२०२२ व २०/०४/२०२२** रोजी या दोन दिवसांतच आपल्या प्रतिनिधीमार्फत कोल्हापूर विभागीय मंडळामध्ये हस्तपोहोच जमा करावे.

आपल्या कनिष्ठ महाविद्यालातील आवेदन पत्र सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे प्रात्य / तोंडी / श्रेणी परीक्षा घेतली असल्याची खात्री करावी. कोणत्याही विद्यार्थ्यांची परिक्षा घेतली नाही / गुण देण्याचे राहून गेले अशी कोणतीही तक्रार करता येणार नाही. तरी वरील दिलेल्या सुचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

सदरचे साहित्य वेळेत मंडळ कार्यालयाकडे प्राप्त न झालेस व संबंधित विद्यार्थ्यांच्या निकालावर विपरीत परिणाम झाल्यास त्याबाबत आपणास जबाबदार धरणेत येईल याची नोंद घ्यावी, याबाबत मंडळ जबाबदार राहणार नाही.

(सत्यवान सोनवणे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीसाठी,
१) मा. सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, पुणे.
२) मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर.
३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सांगली/ सातारा/ कोल्हापूर.